## मध्यवर्ती लेखापरिक्षण शाखा

मध्यवर्ती लेखा परीक्षण शाखेमध्ये जिल्हा परिषद अंतर्गत सर्व विभागाकडील योजना मंजुरीबाबत प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता व खर्चास मान्यतेबाबत प्राप्त संचिकेवर अभिप्राय देण्यात येतात. तसेच विभागाकडुन प्राप्त देयकांचे पुर्व लेखापरिक्षण करुन पारित करणे.

## अंतर्गत पडताळणी पथक

महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधरण विभाग,मंत्रालय, मुंबई यांचे संदर्भ क्र.एपीटी-/1092/सीआर-76613 दि.07.10.1997 व दि.05.12.2015 नुसार जिल्हा परिषद व पंचायत समितीमधील लेख्याच्या तपासणीसाठी जिल्हा स्तरावर अंतर्गत लेखा परीक्षण पथके निर्माण करण्यात आलेली आहेत. सदर पथकामार्फत पुर्ण झालेल्या आर्थिक वर्षाचे खाते प्रमुख व पंचायत समितीचे अंतर्गत लेखा परीक्षण करण्यात येते. स्थानिक निधी लेखा, पंचायत राज समिती व महालेखापाल कार्यालयाकडील लेखा आक्षेपांची पुर्तता करण्यासाठी समन्वय व मार्गदर्शन केले जाते. तसेच जिल्हा परिषद कर्मचा-यांचे वेतन आयोगानुसार होणा-या सुधारित वेतन निश्चितीची पडताळणी या विभागामार्फत केली जाते.